Issue VI , Vol. II	Peer Reviewed	ISSN : 2279-0632
July- 2026	SJIF Impact factor	Impact Factor : 4.291

MAHMUL03034 ISSN 2279-0632

Global Dreams

International Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

July 2026
Issue- VI, Vol. II

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Editor

Dr. Vilas Gaikwad
HOD, Department of Public Administration
Matoshri Shantabai Gote Arts, Commerce & Science College
Washim Dist. Washim
Sant Gadge Baba Amravati University Amravati

Shaurya Publication , Latur

Index

1. **Liberty in the Political Philosophy of Isaiah Berlin: A Philosophical Inquiry** 07
Anshul C. Wankhede, Dr. Vedprakash Dongaonkar

2. **Environmental Movements in 21st Century India and Their Impact on Policy Formation and Environmental Governance** 09
Akshay Govind Pawar, Prof. Dr. Vilas S. Tale

3. **Women's Reservation Provisions and Political Participation in The Panchayati Raj System-A Critical Study** 17
Ajinkya Surendra Kadam, Dr. P. K. Nandeshwar

4. **Fiscal decentralization and local governance performance - An analytical study** 22
Chaitanya Ashok Bagade , Dr.Vilas Gaikwad

5. **Accountability, Transparency and Ethics: An Integrated Framework For Governance in The Digital Age – An Indian Context** 28
Prabodh Janardan Wankhade, Prof. Dr. Vilas Gaikwad

6. **Innovation and use of technology in waste management** 36
Tanmayee Gajanan Padmane, Dr. Vilas Aba Gaikwad

7. **Building Constitutional Citizens: A Critical Review of Constitutional Values and Citizenship Education in Indian Schooling** 40
Shubham Bhimrao Gawai, Prof. (Dr.) Vilas S. Tale

8. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या 'लोकशाही आणि ग्रामराज्य' संकल्पनेचा तात्त्विक दृष्टिकोनातून तौलनिक अभ्यास** 50
योगेश रामभाऊ मडावी, डॉ. वेदप्रकाश डोणगावकर

9. **विज्ञाननिष्ठ, समाजनिर्मितीपूरक अण्णाभाऊ साठे यांची शाहिरी** 54
श्री विठ्ठल गणपत महाल्ले, डॉ. विष्णू नामदेव लांडे

10. **अमरावती जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीच्या योजनांची अंमलबजावणी : एक चिकित्सक अभ्यास** 57
भारत सिताराम डोंगरे, डॉ. विलास गायकवाड

11. **नारायण सुर्वे आणि नामदेव ढसाळ यांच्या सामाजिक विद्रोहाचा तौलनिक अभ्यास** 64
गजेंद्र सोनबा टोम्पे, डॉ. विष्णू नामदेव लांडे,

12. **महाराष्ट्र विधान परिषदेतील सुधारणांची गरज : एक चिकित्सक अभ्यास** 69
कुणाल सोपान इंगळे, प्रा. डॉ. विलास एस. टाले

13. **मराठी बालसाहित्य : स्वरूप, भूमिका व काळाची गरज** 73
प्रतिमा रामकृष्ण कस्तुरे, प्रा.डॉ.एस.ई.नवलाखे

9 विज्ञाननिष्ठ, समाजनिर्मितीपूरक अण्णाभाऊ साठे यांची शाहिरी

श्री विठ्ठल गणपत महाल्ले
संशोधक विद्यार्थी,
मराठी विभाग, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशीम
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

डॉ. विष्णू नामदेव लांडे
संशोधन मार्गदर्शक,
मराठी विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशीम
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील लोकविलक्षण प्रतिभावंत शाहीर म्हणून ओळखले जातात. मराठी साहित्य विश्वात त्यांनी अनेक साहित्य प्रकारांचे लेखन केले. इतर प्रचलित साहित्य प्रकारांबरोबरच, त्यांनी शाहिरी वाङ्मय या प्रकारांतूनही मोठ्या प्रमाणात निर्मिती केली. शाहिरीतील पोवाडा व लावणी हे दोन्ही प्रकार त्यांनी समर्थपणे हाताळले. आपल्या शाहिरीतून समाज प्रबोधन तर केलेच, शिवाय विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्वी लिहिल्या गेलेली लावणी ही प्रामुख्याने अधिकतर शृंगारीक चित्रण करण्यात गुरफटली असल्याचे दिसून येते. लावणीने अधिकाधिक स्त्री व स्त्रियांच्या सौंदर्याचे चित्रण करण्यातच धन्यता मानले. परंतु मराठी लावणीला अण्णाभाऊंनी वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला. कामगार, कामगारांचे जीवन, कामगारांच्या समस्या, गुलामगिरीविषयी चीड अण्णाभाऊंनी आपल्या लावणीतून अधोरेखित केली. एक प्रकारे आपल्या शाहिरीतून विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करण्यासाठी आवश्यक अशी अनेक मूल्ये समाजात रुजवली. समाजाला शिकवण देताना पारंपरिक वळणाचे शिक्षण न देता, सुधारणावाद व विज्ञानवाद यावर त्यांनी भर दिला. मराठी शाहिरी आणि अण्णाभाऊ यांचे असे अविभाज्य असे समीकरण तयार झाले आहे. अण्णाभाऊंना ज्ञानाची, शिक्षणाची, साहित्याची परंपरा नसतानाही त्यांनी साहित्य विश्वाला अनमोल अशी देण दिली आहे. विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करण्यासाठी लागणारी अनेक मूल्ये व तत्त्व अण्णाभाऊंच्या शाहिरीतून आढळतात. त्याचा परामर्श पुढीलप्रमाणे घेता येतो.

अलीकडील काळात वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजविण्यासाठी अनेक अभ्यासक प्रयत्न करत आहेत. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी वैज्ञानिक दृष्टीकोनासाठी स्वायत्तता, शोधकता, निर्भयता, नम्रता यासारखे गुण आवश्यक मानले. वैज्ञानिक दृष्टीकोन ही विचार व कृती करण्याची पद्धती मानली जाते. वैज्ञानिक दृष्टिकोनामध्ये एखाद्या गोष्टीला, घटनेला किंवा समजाला त्यामागे असलेला विज्ञानाचा आधार व सिद्धांताच्या दृष्टीतून बघणे अपेक्षित असते.

वैज्ञानिक दृष्टिकोन मानवाला विवेकी बनवतो. मानवाने जीवनाकडे कसे पाहावे हेही शिकवण्याचा प्रयत्न होतो. अण्णाभाऊं साठे यांच्या लावणी व पोवाड्यातून हा दृष्टिकोन प्रामुख्याने आढळून येतो.' तू मराठमोळा' या लावणीतून शेतकऱ्याचे वर्णन करताना

ही तुझीच धरतीमाता, तू विश्वाचा निर्माता।
तुझी चराचरांवर सत्ता, तू या जगताचा दाता। (पृ. 30)

अशी विवेकी भूमिका त्यांनी मांडली आहे. शेतकरी हाच विश्वाचा निर्माता असल्याचे अण्णाभाऊनी ठणकावून सांगितले आहे.

विज्ञाननिष्ठा ही दास्य, जुलूम, गुलामगिरी नाकारते. त्यानुसारच अण्णाभाऊनीही आपल्या शाहिरीतून दास्य, जुलूम, गुलामगिरी, परचक्र यांना विरोध केला. समाजव्यवस्थेत स्वातंत्र्य, समता व बंधूतेची अपेक्षा वर्तविली. त्यांच्या पोवाड्यातून एकात्मतेची हाक दिली आहे.

उभयू या ऐक्याची भिंत।
महाराष्ट्र करुनि संयुक्त।
दु:ख दैन्य दिसेना जेथ।(पृ.11)

याप्रमाणे या राज्यात एकात्मता निर्माण होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

महाविदर्भ, गोवा, मराठवाडा सारा सांधुनी देश हा। (पृ12)

असाही एकात्मतेचा भाव त्यांच्या पोवाड्यात आढळतो.

अण्णाभाऊंनी समाजाची जडणघडण करीत असताना, अंधश्रद्धाळू समाज मनाला विरोध दर्शविला आहे. त्याबाबतची कितीतरी उदाहरणे त्यांच्या लावणी व पोवाड्यातून आढळून येतात. समाजाची उभारणी ही विज्ञाननिष्ठ विचारावरच झाली पाहिजे अशी भूमिका त्यांच्या शाहिरीतून आढळते.

'कथा मुंबईची' या लावणीतून आर्थिक विषमतेच्या विदारक परिस्थितीवर त्यांनी भाष्य केले. मुंबईत ज्याच्याकडे आहे, त्यांच्याकडे भरपूर काही आहे, परंतु नाही त्यांच्याकडे काहीच नसल्याचे दिसून येते. अशा विदारक परिस्थितीचेही त्यांनी आपल्या शाहिरीतून चित्र रंगविले आहे. त्यामुळेच

त्यांचा कुबेर येथे हेवा करतो।

इथं गरीबाची शेंडी यम धरतो। (पृ.31)

अशी भयावह परिस्थिती आपल्या शाहिरीतून अधोरेखित केली.

वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विचार करताना समग्र बाजूनी विचार करावा लागतो. असा विचार अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरीतून अनेक उदाहरणातून आढळतो. " तू मराठमोळा' या लावणीतून माणूस हाच विश्वाचा निर्माता, जगताचा दाता असल्याचे ते निक्षून सांगतात. असे विचार मांडताना त्यांनी समग्र विचार करूनच, आपले विचार व्यक्त केले असल्याचे निदर्शनास येते. " तू मराठमोळा' या लावणीतून समतेची शिकवण दिली. हे तत्व त्यांच्या अनेकविध लावण्या व पोवाड्यातून दिसून येते.

त्या तुझ्या जुन्या खोपीत समतेचा पाळणा हाले।
एकीनं वाढवून तिला कर ब्रीद आपुले।(पृ.30)

अशी शिकवण दिलेली आढळते.

वैज्ञानिक दृष्टिकोनामध्ये कोणत्याही संकल्पनेचा विचार करताना, ती संकल्पना अंतिम मानली जात नाही. कोणताही अभ्यासक आपली संकल्पना प्रमाण व अंतिम मानत नाही. आपले हे मत येणाऱ्या काळात नव्या संशोधनातून, संदर्भातून बदलू शकते अशी त्यांची धारणा असते. अशी नम्रता अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरीतूनही आढळते. विज्ञान नेहमीच नम्र असते. विज्ञान नेहमीच नवनवीन बदलांना आत्मसात करते. वैज्ञानिक दृष्टिकोन एखाद्या धर्माप्रमाणे, अंतिम सत्याचा दावा कधीही करत नाही.

अण्णाभाऊ यांनीही नवसमाज निर्मितीबाबत आपली भूमिका मांडली. मोगली शासन व्यवस्थेचा त्यांनी विरोध केला. मोगल, आदिलशाही यासारख्या शासन व्यवस्थेने जुलूमशाहीचे पोषण केले, जनतेची पिळवणूक केली. यामुळे अण्णाभाऊ साठे नवसमाज निर्मितीसाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याला आदर्श राज्य मानताना दिसतात. अशाच राज्यव्यवस्थेची अपेक्षा त्यांनी आपल्या शाहिरीतून व्यक्त केली. याचप्रमाणे इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरोधातही प्रहार केला. इंग्रजाच्या अन्यायाच्या विरोधात देश पेटून उठला त्याबाबतचे रोमहर्षक चित्रण पोवाड्यातून केले.

सार्वभौम सम्राट आम्ही नच समरांगणी कधी मागे फिरू।

अशा शब्दांत त्यांनी वर्णन केले. तर मशीन गन वाला, सुवर अश्या अर्थपूर्ण प्रतिमांतून इंग्रजांचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन चमत्कारावर विश्वास ठेवत नाही. अण्णाभाऊनांही चमत्कार अपेक्षित असल्याचे दिसत नाही. मानवाला जे काही मिळवायचे असेल ते त्याने स्वतःच्या सामर्थ्यावर मिळविले पाहिजे, यावर अण्णाभाऊंचा दृढ विश्वास होता. अण्णाभाऊंनी मार्क्सवादी बांधिलकी समोर ठेऊन साहित्याची निर्मिती केलेली आहे. त्यामुळेच जगतातील अन्याय, अत्याचार, जुलूम गुलामगिरी, नष्ट करावयाची असेल तर त्यासाठी संघर्ष केल्याशिवाय पर्याय नसल्याचे अण्णाभाऊंना वाटते. परिवर्तनासाठी देवाकडे करुणा मात्र अण्णाभाऊ कुठेही भाकताना दिसत नाहीत. 'मुंबईची लावणी' मध्ये

बदलुनी हे दुबळे जीणे।
होणार ते विजयी ते रण करती।

अशाप्रकारे संघर्षातूनच परिवर्तन होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तर 'महाराष्ट्र देशा अमुच्या' यामध्ये ते

अन्याया पुढती तू कधिही।
मान आपली नमवली नाही।
माळावरती खड्ग पेरुनी।
सज्ज होशी संघर्षा ।(पृ.29)

यातूनही संघर्ष केल्याने माणसाला यश येते ही भावना चित्रीत केली. प्रयत्नवादाची शिकवण त्यांच्या शाहिरीतून आढळते.'महाराष्ट्रावरून टाक ओवाळून काया' यामधून त्यांनी

साकार स्वप्न करण्याचे ।करी कंकण बांधून साचे ।
पर्वत उलथून यत्नांचे ।सांधू या खंड की त्यांचे । (पृ.19)

यातून अण्णाभाऊंनी प्रयत्नवादाची शिकवण देण्याचा प्रयत्न केला आहे व दैववाद नाकारण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

वैज्ञानिक दृष्टिकोनामध्ये प्रयोगशाळेच्या कसोटीवर जे टिकते तेच खरे मानले जाते. अण्णा भाऊंनी आपल्या शाहिरीतून अशाचप्रकारे बुद्धिवादाचे अनेकठिकाणी समर्थन केल्याचे दिसून येते. इंग्रजांसमवेत महाराष्ट्रीयांच्या लढा सुरू असताना

तो पाचारी बुद्धिवाद्यांना। आणि जहालांना, शेतकरी यांना। (पृ.11)

असे सांगत बुद्धिवादाची अपेक्षा वर्तविली असल्याचे दिसून येते.

वैज्ञानिक दृष्टिकोन ग्रंथप्रामाण्य, शब्द प्रामाण्य नाकारतो. कोणाच्याही ग्रंथात लिहिलेले, चिकित्सा न करता स्वीकारणे वैज्ञानिक दृष्टीकोनात अपेक्षित नसते. कोण्या मोठ्या व्यक्तीने सांगितले म्हणून ते खरे मानायचे हेही यामध्ये अपेक्षित नसते.

अण्णाभाऊंनी आपल्या शाहिरीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन प्रवास रेखाटला.' जग बदल घालुनी घाव' यामधून त्यांनी हा प्रवास व्यक्त केला. यातूनही त्यांना विज्ञाननिष्ठ समाज निर्मिती अभिप्रेत असल्याचे दिसून येते.

वैज्ञानिक दृष्टिकोण पूर्वजन्माचे संचित, पाप-पुण्य, दैवत, देव, नशीब याला महत्त्व देत नाही, तर कष्टाला वैज्ञानिक दृष्टिकोनातून महत्त्व दिले जाते. यासोबतच वैज्ञानिक दृष्टिकोन मध्ये वास्तुशास्त्र, ज्योतिष शास्त्र नाकारले जाते. यासारखेही मूल्य अण्णाभाऊंच्या शाहिरीतून मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

वैज्ञानिक दृष्टिकोनामध्ये कार्यकारण भाव अभिप्रेत असतो. जगातील श्रेष्ठ शक्तीमुळे चांगले वा दुष्ट शक्तीमुळे वाईट होते, असे अजिबात म्हणता येत नाही. कोणत्याही घटनेमागे काहीतरी कार्यकारण भाव असतो हे वैज्ञानिक दृष्टीकोनात अपेक्षित असते. हीच भूमिका अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरी तील अनेक उदाहरणातून आढळून येते. वैज्ञानिक दृष्टीकोन वस्तुनिष्ठता अभिप्रेत असते. 'महाराष्ट्राची परंपरा' या पोवाड्यातून अण्णाभाऊंनी सह्याद्रीचे वर्णन करताना वस्तुनिष्ठ वर्णन करण्यावर भर दिला. महाराष्ट्रातील वनस्पती, झाडे, पीके, फळे, फुले यांचे चित्रण पोवाड्यातून आढळते, हे वर्णन वस्तुनिष्ठ स्वरूपात असल्याचे दिसून येते.

वैज्ञानिक दृष्टिकोन मानवाला विवेकी बनतो. मानवाने जीवनाकडे कसे पाहावे हेही यातून शिकविले जाते. अण्णाभाऊंच्या शाहिरीतून हा दृष्टिकोन आढळून येतो. 'तू मराठमोळा' या लावणीतून शेतकऱ्यांचे वर्णन करताना

ही तुझीच धरतीमाता। तू विश्वाचा निर्माता।
तुझी चराचरावर सत्ता। या जगताचा दाता। (पृ.30)

अशी व्यापक भूमिका त्यांच्या शाहिरीतून आढळते. एवढेच नव्हे तर ही पृथ्वी केवळ विशिष्ट जाती-धर्माची नसून, पृथ्वी ही आदिवासी, कोळी, भिल्ल, रामोशी, मांग यासारख्या अनेक जातीची असल्याचे ते निक्षून सांगतात. शिक्षण हे सार्वत्रिक झाले पाहिजे असे त्यांना वाटायचे. ज्ञानाचे कोठार हे सर्वांसाठी खुले झाले पाहिजे ही त्यांची भूमिका होती. विज्ञाननिष्ठ समाजामध्ये शिक्षणालाही महत्त्व दिले जाते. ज्ञानाची मक्तेदारी ठेवू पाहणाऱ्या प्रवृत्तीवर अण्णाभाऊंनी सडेतोड शब्दांत हल्ला केला. या प्रवृत्तीना त्यांनी मक्तेदार, ठेकेदार, राहू-केतू म्हणून संबोधले. अशा प्रवृत्तीने महाराष्ट्र एकेकाळी अंधारात राहिला असल्याचा आरोपही त्यांनी केला. पर्यायाने महाराष्ट्राच्या प्रगतीचा मार्ग बंद झाला, महाराष्ट्र दीन झाला अशी रोखठोक विचारधारा त्यांच्या शाहिरीतून आढळते. पारंपरिक पोवाड्यातून गण, गणपती स्तोत्र, परमेश्वर स्तवन याला महत्त्व दिले जायचे. अण्णाभाऊंनी मात्र या परंपरेला फाटा दिला. त्यांनी गणपती स्तवन न करता, शूर, वीर, योद्धे, क्रांतिकारक, त्यागी, हुतात्मे, राष्ट्रप्रेमी व महापुरुषांना वंदन केले. त्यांच्या 'गणा'तून छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सेनापती बापट, क्रांतीसिंह नाना पाटील, श्रीपाद डांगे यासारख्या शूर, वीर, नररत्न, हुतात्म्यांचे स्मरण केले.त्यांच्या दृष्टिकोनातून त्यांनी देवाला महत्व दिल्याचे दिसत नाही. एक प्रकारे परमेश्वर ही संकल्पना नाकारून, विज्ञाननिष्ठ समाज निर्मितीला पोषक वातावरण निर्माण करून दिले. आपल्या शाहिरीतून श्रृंगारिक चित्रणलाही फाटा दिला. त्याऐवजी कामगार, कामगारांचे जीवन, कामगारांच्या समस्या, दुःख, आर्थिक विषमता यांचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला. 'कामगार स्तवन' मध्येही त्यांनी कामगारांचे पूजन करण्यास प्राधान्य दिले.

ऊर ब्रह्मांडाचे फोडी । काळाचे हाडे मोडी।
आकाश खाली ओठी ।ते मी आज वंदिला। (पृ.28)

अशा शब्दांत कामगारांची महत्ती त्यांनी अधोरेखित केली.

एकूणच अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या यातून मोठ्याप्रमाणात विज्ञाननिष्ठ, समाजनिर्मीतीस पुरक अशी निर्मिती असल्याचे दिसून येते. अण्णाभांऊंनी परमेश्वरांचे स्मरण करण्याऐवजी, शूर-वीरांचे स्मरण करणे पसंत केले. शाहिरी वाङ्मयाचा पारंपरिक ढाचा बदलून कामगारांच्या समस्या चित्रीत केल्या. शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाची आग्रह धरला. वस्तुनिष्ठ मांडणीवर भर दिला. अन्याय, अत्याचार, जुलूम नष्ट करण्यासाठी संघर्ष हाच पर्याय मानला. देव, दैव, नशीब, चमत्कार यावर विश्वास न ठेवता प्रयत्नवादावर विश्वास ठेवला. स्वातंत्र, समता, बंधूता, एकात्मता, मानवतेला महत्व दिले. यामुळे अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरी वाङ्मयातून विज्ञाननिष्ठ, समाजनिर्मितीपूरक निर्मिती झाली असल्याचे दिसून येते.

संदर्भ

- अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या, लोकवाङ्मय गृह, मुंबई,
- अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या, लोकवाङ्मय गृह, मुंबई, बारावी आवृत्ती जून 2017
- मृदगंध भाग 1, राघव पब्लिशर्स, नागपूर, 2) मृदगंध भाग 1, 2) मृदगंध भाग 1, 2) मृदगंध भाग 1, 2) मृदगंध भाग 1 राघव पब्लिशर्स नागपूर प्र. आ्र .2017